Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mr. Bharati Sonawane - Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Munaf Shaikh, Jalgaon (Urdu)

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018


| | | | |
|---|---|---|---|
| 91 | उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी येणाऱ्या अडचणी व उपाय | नासीर शिराळे | 462 |
| 92 | मौखिक इतिहास | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 465 |
| 93 | आदिवासी कोकणा भाषेचा एक शोध | प्रा. जयश्री रामदास बागुल (खरे) | 472 |
| 94 | सावरकरांचा राष्ट्रवाद | प्रा. संतोष शेलार | 477 |
| 95 | बाबुराव बागुलांच्या कवितेतील विविध जाणीवा | डॉ.देविदास बोडेवाड | 489 |
| 96 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनातून अभिव्यक्त होणारा स्त्रीविषयक दृष्टीकोन | डॉ.दादाराव मुंढरे | 495 |
| 97 | प्रशासकीय सुधारणा आणि तंत्र | प्रा.हनमंत हेळवे | 500 |
| 98 | शौचालय व सामाजिक परिवर्तन | प्रा.आर. बी.काळे | 504 |
| 99 | नांदेड जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योगधंदे : एक भौगोलिक अभ्यास | डॉ.यु.एस.कालवटे | 508 |
| 100 | आपत्ती व्यवस्थापन व प्रसार माध्यमे | डॉ. बालासाहेब मुंडे | 512 |
| 101 | दलित कवितेतील आई | प्रा.विलास पंडित | 516 |
| 102 | राजकारण व महिलांचे सक्षमीकरण – एक अभ्यास | विनोद डोले | 520 |
| 103 | जतन व संरक्षण : इफ्ला (IFLA) चे योगदान | श्री.नारायण फड | 524 |
| 104 | बारोमास-होरपळून निघणाऱ्या कृषिकेंद्रित जीवनाची करुण गाथा | डॉ.शकुंतला मारबे | 529 |
| 105 | बखरकारांनी रेखाटलेली संभाजी राजांची अनैतिहासिक प्रतिमा | डॉ.डी.एस.बिराजदार | 533 |
| 106 | अमळनेर येथील प्रताप हायस्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी यांचा भारतीय स्वतंत्र आंदोलनातील सहभागाचा इतिहास-एक अभ्यास | प्रा.किशोर पाटील | 537 |
| 107 | १९९० नंतरच्या प्रसिद्ध लेखकांच्या पत्नींचे आत्मचरित्रे | डॉ.एस.पी.पैकेकरी | 540 |
| 108 | संत तत्वचिंतिके बाह्मीन कार्य | डॉ. सदाशिव सरकटे | 544 |
| 109 | वाचनसंस्कृती – दिशा आणि दशा | डॉ. प्रतापराव मायकवाड | 548 |
| 110 | वृद्धांच्या समस्या – एक समाजशास्त्रीय चिंतन | प्रा. प्रदीप पाटील | 554 |
| 111 | मुस्लीम सत्यशोधक समाजाची वाटचाल (१९६६ ते आजपर्यंत) | प्रा. श्रीचंद चव्हाण | 558 |
| 112 | संत साहित्यमूल्यांचे समकालीन महत्त्व | प्रा. डॉ. धनराज ल. धानोरकर | 561 |
| 113 | क्रांतिनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर : काही निरीक्षणे | डॉ. सुरेश खोब्रागडे | 567 |
| 114 | नव्वदोत्तर समाज जीवन आणि स्थित्यंतरे | - डॉ. किशोर सोनवणे व दिनानाथ पाठक | 573 |
| 115 | निसर्गाचे लीलाचरित्र लिहिणारी ललित प्रतिभा- मारुती चितमपल्ली | प्रा. सचिन पाटील | 578 |
| 116 | परिवर्तनाच्या लढ्याला गतिमान आणि सबल बनविणारे विवेकी चिंतन ! | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 581 |
| 117 | नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह चळवळ | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 588 |
| 118 | महाराष्ट्रातील पायकवाडी सिंचन प्रकल्पाचा इतिहास : एक अभ्यास | प्रा. प्रवीण चव्हाण | 594 |
| 119 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | डॉ. महादेव मुंडे | 598 |
| 120 | शोषण करणाऱ्या नव्या व्यवस्थेचा शोध घेणारी अरुण काळे यांची कविता : 'नंतर आलेले लोक' | डॉ. शशिकांत पाटील | 602 |
| 121 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप आणि जनमानस | प्रा. राजाराम सोळंके | 607 |
| 122 | मानसिक तणावात नाडीशुद्ध प्राणायामाचा परिणाम | कुणाल महाजन | 612 |
| 123 | सामाजिक पर्यावरण : काही निरीक्षणे | प्रा.अंबादास पुले | 616 |



Website – www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# शौचालय व सामाजिक परिवर्तन

प्रा. आर.बी.काळे.
समाजशास्त्र विभाग
र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई.

**प्रस्तावना :**

निरोगी आरोग्य सदृढ देशाची निर्मीती करत असते.देशाच्या व मानवी विकासासाठी स्वच्छता हा घटक अत्यंत महत्वाचा आहे.लहान बालकापासुन वयोवृध्दांपर्यंत स्वच्छतेचे विशेष महत्व आहे. मानवी शरीराला रोगमुक्त राहण्यासाठी,पर्यावरण संतुलनासाठी स्वच्छता असणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या विकासासाठी स्वच्छतेचे योगदान महत्वपुर्ण असते. गरिबी ,बेकारी,निरक्षरता इ. समस्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अस्वच्छता घटक जबाबदार आहे.भारतातील लोक जिथे वास्तव्य करतात तिथे अस्वच्छता खुप मोठया प्रमाणात आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. WHO च्या मते कोणत्याही देशाच्या विकासामध्ये स्वच्छतेचे मापदंड महत्वपुर्ण आहे. जगातील सर्वच देशामध्ये स्वच्छतेबाबत पाऊले उचलली जात आहेत. जागतिक स्तरावर स्वच्छतेचा प्रश्न चर्चेचा विषय बनला आहे.

**उद्देश :-**

१. भारतातील स्वच्छताविषयक कार्यक्रम जाणुन घेणे ?
२. भारतातील शौचालयाविषयी स्थिती अभ्यासणे ?
३. शौचालयाच्या वापरामुळे सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप अभ्यासणे ?

**तथ्य संकलन:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ,मासिके,इंटरनेट इ. साधनांचा वापर करण्यात आला.

भारतामध्ये अनेक समाजसुधारकांनी स्वच्छतेविषयी चळवळी चालविल्या आहेत. मुख्यत्वेकरुन महात्मा गांधी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,संत गाडगेबाबा,सुर्यकांत परिख , डॉ. बिंदेश्वर पाठक यांचे उल्लेखनिय कार्य आहे. या सर्व समाजसुधारकांनी स्वच्छता व आरोग्य सुधारणा, शौचालय व स्नानगृहाची सफाई इ.साठी जनजागृतीची मोहिम राबविली. महात्मा गांधीजींनी स्वच्छता व अस्पृश्यता निवारण्यासाठी कार्य केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वच्छ कपडे,घराची स्वच्छता, स्वच्छताविषयक कार्य केले. ग्रामीण भागातील सफाई, शौचालय सुविधेचा प्रयोग तसेच सार्वजनिक स्वच्छतेसाठी संत गाडगेबाबा यांनी जनजागृती केली व बिंदेश्वर पाठक यांनी कनिष्ठ जातीतील लोकांना घाण वाहुन नेण्याच्या कार्याला विरोध केला,तसेच शौचालय बनविण्यासाठी प्रेरणा दिली. भारतात भारत सरकार आणि राज्य सरकार यांनी देशात व राज्यात स्वच्छतेसंदर्भात वेगवेगळे अभियान सुरु केलेले आहे त्यामध्ये निर्मल भारत अभियान ,सुपुर्ण स्वच्छता अभियान,स्वच्छ भारत अभियान,स्वच्छ भारत अभियान. इ. अभियानाद्वारे वैयक्तीक व सार्वजनिक स्वच्छता संबंधी जागृती व शौचालय संबंधी जागृती व शौचालय बांधुन त्याचा वापर करण्यासाठी प्रचार-प्रसार केला आणि सुरु आहे. त्याचे चांगले परिणाम समाजामध्ये दिसत आहेत.



Scanned by CamScanner

भारतात दर दिवशी ६०० मिलीयन लिटर मुत्र व १३५ मिलीयन किलोग्राम विष्ठा दुर्गंधीच्या स्वरुपात निर्माण होते. त्यामुळे शौचालय या उपयोग किती महत्वाचा आहे हे यावरुन लक्षात येते . प्राचीन नगरराज्यात स्वच्छता सुविधाची उपलब्धता आणि सार्वजनिक आरोग्याबाबत काही निष्कर्ष नोंदविले आहे.डॉ.सईफुल्हा खान यांच्या मते मोहेंजोदडो येथे सांडपाण्यासाठी विटांनी बांधलेली बंदिस्त व उघडी गटारे आणि सार्वजनिक संडास सापडली आहे.यावरुन असे लक्षात येते की प्राचीन काळी सुध्दा स्वच्छतेबाबत विशेषत: शौचाच्या क्रियेसंबंधी लोक जागृत होते हे आपल्याला मोहेंजदडो व हडप्पा या संस्कृतीत पहावयास मिळाले. सद्स्थितीत मात्र आजही २०११ च्या जनगणेनुसार भारतात सुमारे ६८.८४ टक्के लोक ग्रामीण राहत आहेत. या ग्रामीण समुदयातील लोकांना प्राचीन काळापासुन उघडयावर शौचाविधी करण्याची सवय लागली आहे. ही उघडयावर शौचविधी करण्याच्या सवयी आजही मोठया प्रमाणात चालु आहे.जगातील जवळपास सर्वच विकसीत देशामध्ये विकासाच्या मापदंडात स्वच्छता या घटकाला महत्वाचे स्थान आहे. "जगामध्ये २.५ करोड लोकांजवळ साफ-सफाई,स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध नाही, त्यातुन एक तृतीयांश लोक हे भारतात राहतात यावरुन असे लक्षात येते की भारतात स्वच्छतेकडे दुर्लक्ष करण्याचे प्रमाण जास्त आहे. भारतात जवळपास ६५ करोड लोकांकडे शौचालयाची सुविधा नाही." अस्वच्छतेच्या या समस्येचे निवारण करण्यासाठी शासन व गैर शासकीय संस्था पुढे येऊन काम करायला सुरवात केलेली आहे. याचा भाग म्हणुन केंद्र सरकारने निर्मल भारत अभियान, स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातुन देशातील प्रत्येक व्यक्तीला स्वच्छता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्यासाठी प्रेरित केले आहे. याच प्रेरणेतुन भारतातील शौचालयाची संख्या वाढलेली आपल्याला लक्षात घेता येऊ शकते.

**ग्रामिण भागातील उपलब्ध-शौचालय सुविधा**
( वर्ष २०००-०१ ते २०११-१२ )

| वर्ष | प्रमाण टक्के |
|---|---|
| २०००-२००१ | २१.९० |
| २००१-२००२ | २२.३८ |
| २००२-०३ | २२.८६ |
| २००३-०४ | २७.३४ |
| २००४-०५ | ३०.५६ |
| २००५-०६ | ३२.०२ |
| २००६-०७ | ३९.०३ |
| २००७-०८ | ४८.०२ |
| २००८-०९ | ५६.०३ |
| २००९-१० | ६३.७८ |
| २०१०-११ | ७१.२८ |
| २०११-२०१२ | ७१.२८ |

संदर्भ Annual Report २०११-१२ DDws go ( p-५१)

स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातुन २०१२-१३यावर्षी एकुण वैयक्तीक शौचालयाची संख्या ४५५९१६२ ईतकी होती ती वाढुन २०१५-१६ पर्यंत ९७०३४३७ इतकी झाली आहे. भारतातील काही राज्यामध्ये उघडयावर जाण्याच्या सवयी पुर्णपणे बंद झाल्या त्या राज्यांना Open Defication Free असे घोषित केले आहे. त्यामध्ये सिक्कीम, हिमाचलप्रदेश, केरळ, उत्तराखंड, हरियाना, गुजरात,

चंदिगड,आणि दिव-दमन या राज्यांचा समावेश आहे. याचा अर्थ असा की लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरुकता निर्माण होऊन स्वच्छतेविषयक अभियानाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद देत आहे. वेगवेगळ्या समस्यांचे समाधान सोडविण्यासाठी शौचालयाकडे पाहिल्या जाऊ शकते, स्वच्छतेचा प्रत्यक्ष संबंध शौचालयाशी आहे. शौचालय नसल्यास मलमुत्र विसर्जनासाठी अनेक अडचणी निर्माण होतात, त्यातून सामाजिक समस्या निर्माण होतात. त्या निर्माण होऊ नये यासाठी शौचालयाचे फायदे लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तन होण्यास मदत होते.

**शौचालयाचे फायदे : शारिरी क गरज**

प्रत्येक व्यक्तीच्या जशी भुख, तहान, झोप आवश्यक गरज आहे. तशीच मलमुत्र विसर्जनाची सुध्दा आहे. ज्यापध्दतीने भुक,तहान,झोप इ. टाळता येत नाही तरोच मलमुत्र विसर्जन करणे टाळु शकत नाही जर आपण तसे केल्यास अस्वस्थता निर्माण होते त्यामुळे कोणत्याही कार्यात आपले लक्ष केंद्रित होत नाही. त्यामुळे आपली कार्यक्षमता कमी होत जाते त्यासाठी शौचालय असणे व त्याचा वापर करणे ही शारीरीक गरज आहे.

**कौटुंबिक प्रतिष्ठा :**

सामाजिक प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा हवी असते प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी व्यक्ती हा प्रयत्नशील असतो. कुटुंबात शौचालय असणे सद्यस्थितीत प्रतिष्ठेचे मानले जाते घरातील सर्वांसाठी विशेषत:महिलाच्या सुरक्षिततेसाठी शौचालय महत्वपुर्ण आहे. त्यामुळे कुटुंबातील विवाहप्रसंगी कुटुंबामध्ये शौचालय असणे अनिवार्य मानल्या जात आहे. कुटुंबात येणारे पाहुणे आणि कुटुंबातील वृध्दांसाठी शौचालय असल्यास सामाजिक प्रतिष्ठा समाजात वाढत चालली आहे.

**आर्थिक फायदा :**

घरामध्ये शौचालय असल्यास आर्थिक फायदा होतो. विशेषकरुन कुटुंबातील आजारी सदस्याला शौचालयामुळे कोणतीही समस्या निर्माण होत नाही .शौचालय नसल्यास शौचास वेळेवर न गेल्यास पोटाचे आजार उद्‌भवुन आजार बरे करण्यासाठी आर्थिक परिस्थीती डबघाईस येते. त्यामुळे शौचालय बनविण्यासाठी लागणाऱ्या खर्चापेक्षा जास्त खर्च आरोग्यावर आपण करत असतो. तसेच शौचालयामुळे आजुबाजुला दुर्गंधी पसरत नसल्यामुळे आजाराचे प्रमाण कमी होऊन आजारावर होणारा खर्च हा बचत होत जातो. त्यामुळे वैयक्तीक आर्थिक स्थिती सुधारते, त्याचबरोबर देशाच्या दरडोई उत्पनातसुध्दा वाढ होत जाते."( युनिसेफ २०१२ ) शौचालयाचा वापर न केल्यास याचा एकत्रित परिणाम म्हणजे ६.४ टक्के आर्थिक घट भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनावर होतो." यावरुन असे दिसुन येते की शौचालयाचा वापर केल्यास उत्पादनाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

**आजाराचे प्रश्न कमी होतात :**

शौचालयाच्या वापरामुळे निरोगी आरोग्य निर्माण होते ,पोटाचे आजार, पोटाची सफाई, इ.आजार निर्माण न होण्यास शौचालय फायदेशीर ठरते. अस्वच्छतेमुळे होणारे मलेरिया, कॉलरा, डेंगु सारखे आजार पुन्हा-पुन्हा उद्‌भवत नाहीत. व्यक्तीच्या शौचालयाविषयी जनजागृतीमुळे आरोग्यात सुधारणा होत आहे.



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

**स्वच्छतेच्या सवयी :**

शौचालय तयार करुन त्याचा उपयोग केल्यामुळे सर्वांना स्वच्छतेच्या चांगल्या सवयींचा भाग बनत चालला आहे. घर बनविण्यापासुन शौचालय सुविधेचा विचार केला जातो.शौचालय वापराबरोबर हात धुण्याच्या सवयी ,शौचालय साधनाची सफाई व्यक्तीमध्ये या सर्व सवयी निर्माण झाल्या आहे. देवालय जसे निर्मळ ठेवतो तशीच भावना शौचालयासंबंधीत ठेवली जात आहे.

**लाज व संकोच याचा त्याग :**

शौचाची क्रिया वैयक्तीक असली तरी योग्य ठिकाणी शौचालयात शौचास बसण्याची लाज व संकोच वाटत नाही. शौचालयाचा उपयोग करणे ही एक सहज क्रिया बनली आहे. याउलट जे व्यक्ती उघड्यावर शौचास जातात विशेषतः महिलांना त्यावेळेत लाज व संकोच वाटतो तसेच पुरुषांची भिती ,साप विंचु अडचणीच्या ठिकाणी चावण्याची शक्यता असते प्रसंगी अवेळी शौचास जाणे अशा वेळेत शौचालयाचा उपयोग करणे हिताचे ठरते त्यामुळे लाज व संकोच व्यक्तीच्या मनात राहत नाही.

**पर्यावरण स्वच्छतेस पुरक :**

शौचविधी प्रत्येक व्यक्तीची सहज प्रक्रिया आहे .उघडयावर मलमुत्र विसर्जनामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असतो. उघड्यावर शौचास गेल्यामुळे आजार होण्याबरोबर पर्यावरणीय समस्या निर्माण होण्यास मदत होते विशेषतः ग्रामीण भागात
शौचास उघड्यावर जाण्याच्या प्रक्रियेमुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत चालला आहे. भुमि प्रदुषण, जलप्रदुषण,वायु प्रदुषण होण्याचे प्रमाण यामुळे वाढत चालले आहे. शौचालय वापराची जनजागृती होत असल्यामुळे उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे पर्यावरण प्रदुषित होण्याचा धोका कमी होत आहे. त्यामुळे शौचालयाचा वापर पर्यावरणाचे रक्षण करण्यास मदत करते.

RESEARCH JOURNEY

**सारांश :**

सामाजिक परिवर्तनांच्या दृष्टीने स्वच्छता व शौचालयाकडे लक्ष केंद्रित केल्यास सामाजिक, आर्थिक, पर्यावरणात्मक परिवर्तन घडवुन येण्यास मदत होते . ही बाब सर्वांपर्यंत पोहचविणे अत्यंत आवश्यक आहे. लहान बालक, महिला, वृध्द या सर्वांच्या आरोग्याच्या दृष्टीने शौचालयाचा अंगीकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे येणारी भावी पिढी सशक्त निर्माण होइल व त्यांना अस्वच्छतेतुन निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही. शौचालयाचे महत्व पटवुन देण्यासाठी सामाजिक संयोग व सहकार्य होणे आवश्यक आहे तेव्हाच स्वच्छतेतुन सामाजिक परिवर्तन होऊ शकते. त्यासाठीच गावागावातुन स्वच्छतेच्या व शौचालयाच्या सवयी लागणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१. वाघेला,अनिल,स्वच्छता का समाजशास्त्र , कल्पाज पब्लिकेशन, दिल्ली, २०१५
२. Sanitation, indiawatre portal. Org. mode dated-१०/०९/२०८
३. पिल्लई के विजयन, पारेख रुपल, भारत मे स्वच्छता और सामाजिक विकास,योजना ,जनवरी ,२०१५
४. Shodhganga, Inplibnet ac.in dated १८/०९/२०१८
५. Swachhindia. Ndtv.com date १५/०९/२०१८
६. पियर्स, ग्रेगरी, संपूर्ण स्वच्छता मे बाधाएँ, योजना जनवरी २०१५



Scanned by CamScanner